दूरध्वनी क्र. ०२२-२६८३३०५४
Email : dcpdetection1.mum@mahapolice.gov.in

**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)**
यांचे कार्यालय
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
अंधेरी पोलीस ठाणे आवार, अंधेरी (पुर्व),
मुंबई - ४०० ०६९.

# प्रेसनोट

**कक्ष-६, गु.प्र.शा., गु.अ.वि., चेंबूर, मुंबई** **दिनांक : १६/०७/२०२२**

## मुंबई शहरातील व राज्यातील विविध परीसरातून चोरी केलेले स्मार्टफोन विकत घेवून देशातील विविध राज्यांत विक्री करणा-या टोळी विरुध्द् कारवाई करुन ४८० स्मार्टफोन तसेच गांजा, देशी-विदेशी दारू आणि तलवारीसारखे घातक शस्त्र जप्त करण्यात कक्ष ६ गुन्हे शाखेस यश...

| | |
|---|---|
| **कक्ष** | कक्ष-६ गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.विभाग, चेंबूर, मुंबई. |
| **पोलीस ठाणे** | ट्रॉम्बे पोलीस ठाणे, मुंबई. |
| **गुन्हा नोंद क्र. व कलम** | गु.प्र.शा. गु.र.क्र.१०२/२०२२, कलम ३७९,४२०,१२०(ब) ४११, ४१३, भा.द.वि सह कलम ८ (क) सह कलम २०(ब)(२)(ब) २९ एन.डी.पी.एस ॲक्ट सह कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम सह कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१), १३५ म.पो.का भादंवि. |
| **गुन्हा दाखल दिनांक** | दि. १६/०७/२०२१ रोजी १४:२५ वा. |
| **गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण** | दि. १५/०७/२०२२ रोजी व त्यापूर्वी पासून<br>ठिकाण- महाराष्ट्र नगर, मानखुर्द मुंबई . |
| **फिर्यादी नाव** | श्री. संभाजी विठ्ठल कोळेकर, वय ३४ वर्षे, नोकरी, पो.शि.क्र. ०८०२९६ नेमणुक गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष ६, चेंबूर, मुंबई. |
| **ताब्यात घेतलेल्या आरोपीची संख्या** | ०२ पुरुष इसम |

मुंबई शहरात दिवसेंदिवस मोबाईल चोरीच्या गुन्हयात झपाटयाने वाढ होत असल्याबाबत मा. पोलीस सह आयुक्त, गुन्हे यांनी गांभीर्याने दखल घेवून, सदर मोबाईल चोरीचे गुन्हे उघड करण्याबरोबरच गुन्हयाचे समुळ उच्चाटन करण्याबाबत आदेश दिले. त्याअनुषंगाने कक्ष ६ कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक ते मार्गदर्शन वजा सुचना करून, मोबाईल चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंधक करण्याचे उद्दीष्ट ठेवून त्यानुसार कार्यवाही सुरु होती.

कक्ष-६,गु.प्र.शा.,गु.अ.वि. चेंबूर, मुंबई येथे नेमणूकीस असलेले पो. शि. क्र.०८०२९६/कोळेकर, यांना गुप्त बातमीदाराने एक इसम हा चोरीचे मोबाईल खरेदी करतो. अशी माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीची सर्वांगीन चौकशी करण्याकरीता एक पथक नेमण्यात आले. सदर पथकाने महिनाभरापासून सतत्याने

गोपनीयतेने माहिती गोळा करून, आरोपी इसम हा मोबाईल खरेदी करून, त्याची साठवणुक कोठे करतो, नमूद मोबाईलची विल्हेवाट कधी व कशी करतो तसेच इतरही गोपनीय माहिती संकलित केली.

दिनांक १५/०७/२०२२ रोजी रात्रौ संशयित इसम हा खरेदी केलेल्या मोबाईलची व्हिलेवाट लावणार असल्याबाबत गोपनीय बातमीदाराकडून ठोस माहिती प्राप्त होताच मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ६ मधील पोलीस पथकाने महाराष्ट्र नगर, मानखुर्द मुंबई .या ठिकाणी अत्यंत नियोजनपूर्वक छापा टाकून त्याचे घरातून विविध नामांकित कंपन्याचे ४९० स्मार्ट फोन ज्यामध्ये ४१ ॲपल कंपनीच्या मोबाईल फोनचा देखील समावेश आहे., १ लॅपटॉप, हिटरमशीन, हिटरगन असे साहित्यासोबतच ९ कि. ५९० ग्रॅम वजनाचा गांजा, देशी-विदेशी दारूच्या एकूण १७४ बाटल्या, ०२ तलवारी अशी **एकूण ७४ लाख ७८ हजार ५२२ रूपये किमतीची मालमत्ता पंचात्यातंर्गत हस्तगत केली.**

आरोपी इसम हा त्याचे साथीदारांसह मुंबई शहरातील तसेच राज्यातील विविध परीसरातून चोरी केलेले, स्नॅचिंग केलेले, पिक पॉकिटींग केलेले मोबाईल विकत घेवुन त्याचे आय.एम.ई आय क्रमांक बदलुन त्यास रॅपर मध्ये पॅक करून देशातील विविध राज्यांत विक्रीकरीता पाठवितात. अशा प्रकारे कक्ष ६ पथकाने चोरीचे ४९० मोबाईल फोन म्हणजेच ४९० मोबाईल चोरीचे गुन्हे उघड केले आहेत. **कक्ष ६ पथकाने एका क्षुल्लक माहितीचा आभ्यास करून, मोबाईल चोरीची टोळी उध्दवस्त करून मोबाईल चोरीच्या गुन्हयांचे समुळ उच्चाटन करून मोबाईल चोरीच्या वाढत्या गुन्हयांना प्रतिबंध करून सामान्या नागरीकांना दिलासा दिला आहे. सदर कारवाईत कक्ष ६ पथकातील पोलीस कॉन्सटेबल क्र. ०८०२९६/श्री.संभाजी विठ्ठल कोळेकर यांचा मोलाचा सहभाग आहे.**

आरोपी इसम हा सराईत गुन्हेगार असून, मोबाईल चोरीच्या गुन्हयांसोबत अंमली पदार्थाची, देशी-विदेशी दारूची अनधिकृतपणे विक्री करतो तसेच स्वत:जवळ तलवारी सारखे घातकशस्त्र जवळ बाळगतो त्याअनुषंगाने ट्रॉम्बे पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करून ०२ आरोपी इसमांना अटक करण्यात आली आहे. त्याना मा. न्यायालयाने पोलीस कोठडी दिली असून, कक्ष ६ मधील पोउपनि संदिप रहाणे गुन्हयाचा अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री सुहास वारके सो, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री विरेश प्रभु सो, मा.पोलीस उपायुक्त ,श्री संग्रामसिंह निशानदार सो, व मा.सपोआ (डी पुर्व), चंद्रकांत जाधव सो यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक रविंद्र साळुंखे, पो.नि. एच.एम. ननावरे, पो.नि. प्रविणकुमार बांगर, स.पो.नि. सचिन गावडे, स.पो.नि. मिरा देशमुख, पोलीस उप निरीक्षक सुभाष मुठे, पोलीस उप निरीक्षक संदिप रहाणे, स.फौ. १७८३/बेंडाले, स.फौ.२७५३५/सावंत,, स.फौ. २७८७१/आव्हाड, स.फौ. ३९५९/कुरडे, स.फौ.क्र. २९३६१/ देसाई, पो.ह.क्र. ३१७३४/सावंत, पो.ह.क्र. ९७०५४२/भिलारे, पो.ह.क्र. ९८०६९७/तुपे, पो.ना.क्र. ०४०३६३/शिंदे, पो.ना.क्र.०४११३२/गायकवाड, पो.ना.क्र. ०३१००८/वानखेडे, पो.ना.क्र.०५०७४२/मोरे, पो.ना.क्र.०६१२९४/आराख, पो.शि.क्र. ०६१७०३/घेरडे,पो.शि.क्र. ०७०४००/भालेराव,पो.शि.क्र.०७०७७४/माळवेकर,पो.शि.क्र. ०८०२९६/कोळेकर, पो.शि.क्र. ०८०३३९/इंगळे, पो.शि.क्र. ०९०६६४/चव्हाण, पो.शि.क्र. ०९०३१९७/पवार, पो.शि.क्र. ०११०६४१/शेख, पो.शि.क्र. ०१११४०३/कदम, म.पो.शि. ०८१४२६/अभंग, पो.ना.चा.क्र. ००६७४/कदम, पो.ना.चा.क्र. ९८०७६५/डाळे, पो.ना.चा.क्र. ०३१५२४/जायभाये आणि पो.शि.चा.क्र. १७१३६५/पाटील यांचे पथकाने पार पाडली आहे.

****D-1/ /2022****